FORM-1A 0058170 N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि.मुं., पहिली खबर क्र. FIR No.: 22/2024, Year: 2024, दिनांक Date: 04/01/2024

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्रति. अधिनियम १९८८, कलमे Sections: 7
(ii) अधिनियम Act: —, कलमे Sections: —
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day: सोमवार, तारीख पासून Date from: 04/01/2024, वेळ Time ...... तारीख पर्यंत Date to: 06/01/2024, Time: 13:53

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 04/01/2024 वेळ Time ......

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 4/2024, तारीख Date: 07/01/2024 वेळ Time: 0200

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ...... चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र.
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ...... Chouki / Beat / O.P. Name and No.: घनकचरा व्यवस्थापन विभाग, N वॉर्ड, मनपा, जवाहर रोड, घाटकोपर पूर्व,

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: मुंबई - 400077, ठिकाणाचे नंबर No. if any ......, गल्ली Ward ......, रस्त्याचे नाव Name of road ......

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री. विजय
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: अशोक खरात
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 42 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 7029032707
(e) पारपत्र क्रमांक Passport No.: —, दिल्याचा दिनांक Date of Issue: —, दिल्याचे ठिकाण Place of Issue: —
(f) व्यवसाय Occupation: नोकरी
(g) धर्म Religion: बौध्द, जात Caste: —, जनजात Sub-Caste: —
(h) पत्ता Address: F-203, म्हेत्रेपाडा, मोन्यना प्राईमस्कूल; सर्वोदय नगर जवळ, अंबरनाथ - बदलापूर रोड, अंबरनाथ (प.), जि. ठाणे - 421502
Ward, House/Name No., Phone/M. No., PAN No., Card No.
रस्त्याचे नाव, जवळचे प्रसिद्ध ठिकाण, गाव, पोस्ट, पो. स्टे.
Road: 19/सी-304, Nearest identifiable place: सोसायटी, म्हाडा कॉलनी, गौतमनगर, गोवंडी,
तालुका Taluka, जिल्हा Dist.: मुंबई - 43., राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

उध्दव नवनाथ गर्जे, वय 36 वर्षे, धंदा नोकरी (लिपिक - घनकचरा व्यवस्थापन विभाग, N वॉर्ड, मनपा मुंबई), राही - फ्लॅट नं. 904, फेज - 6/F-1, उन्नती वुड्स, घोडबंदर रोड, NHP स्कूल जवळ, कासारवडवली, ठाणे - 400615

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned by PDF Scanner

वरील फिर्यादी श्री. विजय अशोक खरात, वय-४२ वर्षे, यांचा दि०६/०७/२०२४ रोजी संगणकावर मराठीतून स्वतंत्र टंकलिखीत केलेला जबाब हाच सदर गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(मनोज शिरगे)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि. मुंबई.

(विजय अशोक खरात)

फिर्याद दि. ०६/०८/२०२४

श्री. विजय अशोक खरात, वय ४२ वर्षे, धंदा—नोकरी— समार्जक (सफाई कामगार), घनकचरा व्यवस्थापन, एन वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालीका, घाटकोपर पुर्व, मुंबई, सद्याचा पत्ता रा.ठि.—एफ/२०३, मघना मोन्टाना थारवानी, सर्वोदय नगर जवळ, जांबुळ फाटा, अंबरनाथ— बदलापुर रोड अंबरनाथ पश्चिम ठाणे ४२१५०१. कायमचा पत्ता— १९/सी ३०५, निसर्ग को ऑ हौ. म्हाडा कॉलनी, गौतम नगर, गोवंडी पश्चिम, मुंबई ४०००४३. आधारकार्ड क्र ७४३५ ७७०५ ३७२२ मो.क्र. ७०२१०३२७०८

———•———

मी, वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर कुटुंबासह रहावयास आहे. मी सन २०१२ पासुन बृहन्मुंबई महानगरपालीका येथे सफाई कर्मचारी म्हणुन कार्यरत आहे. सद्या मी बृहन्मुंबई महानगरपालीका एन वार्ड घनकचरा व्यवस्थापन घाटकोपर पुर्व मुंबई येथे सफाई कामगार म्हणुन कार्यरत आहे. माझे मासिक वेतनातुन मिळणारे उत्पन्नावर माझे कटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.

मला सन २०२२ पासुन नियत वयोमानानुसार पदोन्नती मिळायला पाहिजे होती. परंतु ती मला मिळाली नाही म्हणुन मी सन २०२२ सालीच रितसर अर्ज केला होता त्याची फाईल सन २०२२ पासुन प्रलंबीत होती. माझ्या पदोन्नतीचे काम पाहणारे आमचे कार्यालयातील लिपीक उध्दव गर्जे यांना मी माझ्या पदोन्नतीबाबत वारंवार भेटत होतो.परंतु ते मला माझी पदोन्नतीची फाईल 'पुढे पाठवली आहे' असे सांगत होते. दि ०२/०७/२०२४ रोजी मी गर्जे यांना समक्ष जावुन भेटलो असता गर्जे यांनी सदरचे काम करून देण्यासाठी माझ्याकडे ५०००/—रु इतक्या रकमेची मागणी केली व प्रथम तुझे पदोन्तीचे काम करुन देतो त्यानंतर ऑगस्ट महिन्याचा पगार झाल्यानंतर तु मला पैसे दे अशा प्रकारे माझ्याकडे पैशाची मागणी केली.

त्यानंतर दि.२८/०७/२०२४ रोजी मला पदोन्नतीचा फरक व पगार असे मिळुन रू. २,९०,०००/— माझे खात्यावर जमा झाल्याची स्लीप माझे मोबाइलवर आली. परंतु अशा प्रकारे स्लीप आल्यानंतर साधारण दोन ते तीन दिवसात पैसे खात्यावर जमा होतात. आमचे कार्यालयातील लिपीक उध्दव गर्जे यांना ठरल्याप्रमाणे पदोन्नतीचे रु ५०००/— मला द्यावे लागणार होते परंतु मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. ०१/०८/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथील कार्यालयात वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो असता त्यांनी मला पो.नि. मनोज जिरगे यांचे कार्यालयात पाठविले. पो.नि. मनोज जिरगे यांनी मला लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगीतल्याने मी रीतसर माझा तक्रारी अर्ज मराठी मध्ये लिहुन दिला. परंतु लीपीक गर्जे यांनी मला पगार जमा झालेवर पाच हजार रुपये देण्यास सांगितले होते परंतु आद्याप माझ्या खात्यावर पगार जमा न झाल्याने मी तक्रार अर्ज देवुन परत माझे घरी आलो. व पगार झाल्यावर मी पुढील कारवाईसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात

VKherat

Scanned by PDF Scanner

पुन्हा हजर राहतो असे पो.नि. जिरगे साहेब यांना सांगितले होते. त्यानुसार दि. ०४/०८/२०२४ रोजी माझे खात्यावर पगाराची व फरकाची रक्कम जमा झालेवर मी दि ०५/०८/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय मुंबई येथे आलो.

त्यावेळी पो.नि. जिरगे यांनी मला ए.सी.पी. शैला कोरडे मॅडम व तेथे उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. जिरगे यांनी पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक ०१/०८/२०२४ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला अर्ज वाचुन पंचांनी अर्जावर स्वाक्षरी करून पो.नि. जिरगे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात घेतला.

त्यानंतर पो.नि जिरगे यांनी बृहन्मुंबई महानगरपालीका घनकचरा व्यवस्थापन विभाग एन वार्ड घाटकोपर पुर्व चे लिपीक गर्जे यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी लाचेच्या मागणी बाबत पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानंतर पो.नि जिरगे, पंच व मी, ला.प्र.वि. कार्यालयात माझी उर्वरीत पोलीस पथकाशी ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पोलीस पथकासह निघून बृहन्मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग एन वार्ड घाटकोपर पुर्व च्या हद्दीतील आशिर्वाद हार्ट हॉस्पीटल घाटकोपर पुर्व येथे शासकीय वाहनासह येवुन थांबलो. तेव्हा मी, पो.नि.जिरगे व पंच क्र.०१ कविटकर व पोह गायकवाड यांचेसह चालत जयंतीभाई मेहता उद्यानाजवळ आलेवर पो.नि. जिरगे यांनी पथकातील पोलीस अंमलदार श्री. गायकवाड याचे मार्फतीने माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पडताळणी कारवाईकरीता लोकसेवक यांचे बृहन्मुंबई महानगरपालीका एन वार्ड विभाग घनकचरा व्यवस्थापन विभाग येथील कार्यालयात पंच श्री. कविटकर यांच्यासह पायी चालत पाठविले.

मी,पंचासह लिपीक उद्धव गर्जे यांचे कार्यालयात गेलो असता गर्जे साहेब हे कार्यालयात हजर होते. मी पंचासह गर्जे यांना भेटलो असता गर्जे यांनी माझे सोबत असलेले पंच कविटकर यांना हातवारे करून खुणेने बाहेर थांबण्यास सांगितले. मी गर्जे यांच्याशी माझ्या पदोन्नतीच्या कामासंदर्भात बोलणी केली असता गर्जे यांनी तोंडाने काहीही न बोलता मला लाचेची रक्कम ही ५०००/–रु एका कागदावर लिहुन दाखविली व लगेच सदरची चिट्ठी ही गर्जे यांनी फाडुन फेकुन दिली. त्यानंतर मी गर्जे यांना सांगितले की, मी थोडया वेळाने परत येतो असे सांगुन मी त्यांचे कार्यालयातुन निघुन पंचासह पुन्हा शासकिय वाहनाजवळ परत आलो. तेव्हा पोलीसांनी माझ्या शर्टच्या आतील

VKhorat

Scanned by PDF Scanner

बाजुस बनीयनला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला तेव्हा मी गर्जे यांच्या कार्यालयात घडलेली सर्व घटना पोलीसांना सांगीतली. लिपीक गर्जे हे लाचेची रक्कम स्विकारण्यास विशेष काळजी बाळगत असून ते लाचेच्या रक्कमेबाबत काही न बोलता इशाऱ्याव्दारे लाचेची मागणी करीत असल्याने आज रोजी लाच स्विकारतील याची शक्यता वाटत नसल्याने उदया कारवाई करण्याबाबत पो.नि. जिरगे यांना मी विनंती केली. त्यानुसार पो.नि. जिरगे यांनी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करीत असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले.

दिनांक ०६/०८/२०२४ रोजी मला सकाळी सफाईचे काम असल्याने लाप्रवि कार्यालयात हजर राहणे शक्य नव्हते म्हणुन मी परस्पर घाटकोपर येथे हजर राहतो अशी पोनी जिरगे यांना विनंती केली. व त्यानुसार आज रोजी माझे काम संपवुन कार्यालयाजवळच थांबुन राहिलो.

पो नि जिरगे हे पथकासह घाटकोपर येथे आल्यानंतर त्यांनी मला जयंतीभाई मेहता उद्यान येथे बोलावुन घेवुन पोलीस पथक थांबलेल्या जोशी गल्ली येथे घेवुन गेले. आता लगेचच सापळा कार्यवाही करावयाची असल्याने पो नि जिरगे यांनी दुसऱ्या शासकिय वाहनाला देखील आम्ही थांबलेल्या ठिकाणी बोलावुन घेतले. पो नि जिरगे यांनी मला पंचांसमक्ष तसेच सापळा पथकाला बृहन्मुंबई महानगरपालीका एन वार्ड विभाग घनकचरा व्यवस्थापन विभाग घाटकोपर पुर्व येथील लिपीक गर्जे यांच्या कार्यालयात सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

पो नि जिरगे यांनी माझे कडे लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता मी माझे पगारातील ५०० रू दराच्या १० नोटा पो नि जिरगे यांचे ताब्यात दिल्या. पो नि जिरगे यांनी सदरच्या नोटा या पंचासमक्ष चालक सफौ जामसांडेकर यांचे ताब्यात देवुन चालक सफौ जामसांडेकर हे यांनी सदर नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावुन त्याचे गुणधर्म पंचाना सांगुन सदरच्या नोटा माझे शर्टाच्या डाव्या खिशात ठेवल्या. यापुढे जामसांडेकर हे सापळा कारवाईत सहभागी होणार नाही असे मला व पंचाना सांगितले.

पो नि जिरगे यांनी मी व पंच कविटकर असे गर्जे यांचे कार्यालयात गेल्यानंतर गर्जे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास सापळा पथकाला इशारा म्हणुन केसावरून हात फिरवण्याबाबतचा पुर्व नियोजित इशारा करतील असे सांगितले.

त्यानंतर मला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र १ कविटकर यांचेसह गर्जे यांचे कार्यालयात पायी चालत रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक हे देखील गर्जे यांचे कार्यालयाचे आजुबाजुला कोणासही संशय येणार नाही अश्याप्रकारे थांबुन राहिल अश्या प्रकारच्या सुचना पो नि जिरगे यांनी सापळा पथकाला तसेच पंचाना दिल्या.

VKhent

Scanned by PDF Scanner

मी व पंच कविटकर यांचेसह लोकसेवक गर्जे यांचे कार्यालयात पोहचलो तेव्हा गर्जे यांचे समोर गर्दी असल्याकारणाने मी व पंच कवीटकर असे थोडा वेळ बाहेर थांबुन राहिलो. त्यानंतर गर्जे यांच्या समोर असलेली गर्दी संपल्यानंतर त्यांनी मला एकट्यालाच इशाऱ्याने आतमधे बोलावुन घेतले. तेव्हा मी त्यांचे समोर हजर राहुन **''तुम्ही बोल्याप्रमाणे पाच हजार रूपये मी आणलेले आहेत तुम्हाला दयाला''..असे बोलले असता त्यांनी ''हा... देना...''** असे बोलुन लाचेची रक्कम स्वीकारण्यास सहमती दर्शवली त्यानंतर मी लाचेची रक्कम रूपये ५०००/— ही उजव्या हाताने खिशातून काढून गर्जे यांच्या हातात दिली त्यानंतर त्यांनी ती रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. गर्जे यांनी लाचेची रक्कम स्वीकारल्याने मी त्यांचे कार्यालयातुन बाहेर आलो व सापळा पथकास दिसेल अशारीतीने केसावरून हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा केला त्यावेळी सापळा पथक हे लिपीक गर्जे यांच्या केबीनमध्ये गेले व त्यांनी लिपीक उद्धव नवनाथ गर्जे यांना ताब्यात घेतले.

तरी आज दि. ०६/०८/२०२४ रोजी लिपीक उध्दव गर्जे यांनी माझे पदोन्नतीचे केलेल्या कामाचा मोबदला म्हणून रू. ५०००/— माझेकडुन स्विकारले म्हणुन माझी लिपीक उद्धव नवनाथ गर्जे यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालीका एन वार्ड घनकचरा व्यवस्थापन विभाग घाटकोपर पुर्व, मुंबई येथे कार्यरत असलेले लिपीक उद्धव नवनाथ गर्जे यांचेशी माझे कोणतेही पूर्व वैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या घेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(मनोज जिरगे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(विक्रम अशोक खरात)

Scanned by PDF Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..................... लागू नाही

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.................................................. ---

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .................. ---

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .................. ---

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फि' हे घनकचरा व्यवस्थापन विभाग, N वॉर्ड, मनपा, घाटकोपर पूर्व, मुंबई येथे सफाई कामगार म्हणून कार्यरत असून त्यांना नियत वयोमानानुसार सन-२०२२ मध्ये पदोन्नती होती. त्यानुसार फि.नी संबंधित विभागास अर्ज केला होता. सदर पदोन्नती देण्यासाठी घ.क.व्य. विभाग, N वॉर्ड, मुं. येथील लिपिक श्री. उध्दव गर्जे यांनी फि'चे पदोन्नतीचे काम करून देतो व ऑगस्ट महिन्यात पगार झाल्यानंतर ५०००/- रु. द्या अशी फि' कडे लाचेची मागणी केली म्हणून फि'नी ला.प्र.वि. मुंबई येथे केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि. ५/८/२४ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी फि.ना दि. ६/८/२४ रोजी येण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे दि. ६/८/२४ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक उध्दव गर्जे यांनी स्वतःच्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करून व स्वतःकरिता गैरलाभ मिळविण्याच्या उद्देशाने नमुद ता. वे. व ठि. नमुद लोकसेवक यांनी फि'कडे ५०००/- रु. लाचेची मागणी करून ती स्विकारताना नमुद लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही - 1. वरील फिर्यादीवरून कलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री. मनोज जिरगे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण.

.................................... --- ....................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ --- ........, जिल्हा ........ --- ........, राज्य ........ ---

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank.................. No..................

to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name श्री. मनोज जिरगे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..................................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..... ०६/०८/२४

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned by PDF Scanner